(1)

म.पा.पु.व ज.नि.मंडळ, आ-5.

---

1993/11/22.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 61 वी बैठक दिनांक 20.10.1993 रोजी मंत्रालय, मुंबई 400 032 येथे मा. नगर विकास मंत्री व मंडळाचे अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीतील चर्चेच्या इतिवृत्ताचा मसुदा मान्यतेसाठी सादर केला आहे.

जबाआं
29/11/93

सोबत : कार्यक्रम बाबी.

(ज.बा.आंबेगावकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी.

सदस्य सचिव.

मा.मंत्री, नगर विकास व
मंडळाचे अध्यक्ष.

Anil Govardhan
2/12/93

CAO
Pls take a review of action taken
on action points.

दिनांक 20.10.1993 (बुधवार) रोजी झालेल्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 61 व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 61 वी सभा बुधवार, दिनांक 20.10.93 रोजी मा. मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष मा.ना. अरुणलाल गुजराथी यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्याच दालनात मंत्रालय येथे दुपारी 3 वाजता संपन्न झाली. या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1) मा. श्री. अरुणलाल गुजराथी<br>मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष. | अध्यक्ष |
| 2) मा. श्री. रणजित देशमुख<br>मंत्री, ग्राम विकास | विशेष निमंत्रीत. |
| 3) मा. श्री. माणिकराव ठाकरे<br>राज्यमंत्री, ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष. | उपाध्यक्ष |
| 4) मा. श्री. अशोकराव चव्हाण<br>राज्यमंत्री, नगर विकास | विशेष निमंत्रीत |
| 5) श्री. गणेश रॉय | सदस्य |
| 6) श्री. एम.आर. अगरवाल | सदस्य |
| 7) श्री. एम.के. गोखले | सदस्य |
| 8) श्री. रा. मा. सगणे | सदस्य सचिव. |

मंडळाचे खालील सदस्य मंडळाच्या बैठकीसाठी उपस्थित राहू शकत नसल्याने त्यांची रजा मंजूर करणेत आली.

1) श्री. डी.टी. जोसेफ,
सचिव (1),
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

2) श्री. सुरेश कुमार,
सचिव,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

3) श्री. एस.एन. पानसरे,
उप सचिव (खर्च)
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

4) श्री. मधुकर पाटील,
आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

5) श्री.जगन्नाथ शिवलींग पाटील,
सदस्य,
जिल्हा परिषद, सोलापूर, जि. सोलापूर.

6) श्री.पी.एस.राजवंशी,
भारत सरकारचे सल्लागार,
मध्यवर्ती सार्वजनिक आरोग्य स्वच्छता संस्था,
नगर विकास मंत्री,
नवी दिल्ली.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1) श्री.शे.दौ. अरमाळ, मुख्य अभियंता (प्रकल्प)

2) श्री.अ.अ. संकपाळ, मुख्य अभियंता (ग्रामीण)

3) श्री. के.आर. मठकर, मुख्य अभियंता (नागरी)

4) श्री. ज.बा. आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.

5) श्री.एम.आर. कुळकर्णी, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

मंडळाचे अध्यक्ष व मंत्री, नगर विकास यांनी बैठकीस सुरवात करताना मंडळात सहअध्यक्ष म्हणून नियुक्ती प्रस्तावित असलेले मंत्री, ग्राम विकास श्री. रणजित देशमुख व सहउपाध्यक्ष म्हणून नियुक्ती प्रस्तावित असलेले, राज्यमंत्री, नगर विकास श्री. अशोकराव चव्हाण, यांचे अभिनंदन करुन सदर बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे हार्दिक स्वागत केले. तसेच सर्व उपस्थित सदस्यांचे व अधिका-यांचेही स्वागत केले. त्यानंतर कार्यक्रमबाबवार चर्चा सुरु करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. 1 :** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 60 व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

मंडळाच्या दिनांक 20 मे, 1993 रोजी झालेल्या 60 व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व सदस्यांना पाठविण्यात आले होते. या इतिवृत्तावर कोणीही सूचना व दुरुस्ती सुचविलेली नाही असे सदस्य सचिवांनी निदर्शनास आणले. तेंव्हा सदर इतिवृत्तास दुजोरा देण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.2 :** मंडळाच्या दिनांक 20.5.93 रोजी झालेल्या 60 व्या सभेतील बाबीवर करण्यांत आलेली कृती.

मंडळाच्या 60 व्या बैठकीतील निर्णयांवर काय कार्यवाही करण्यात आली याचा खुलासा सदस्य सचिवांनी केला. सर्व सदस्यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली. या बाबीवर चर्चा चालू असतांना

...3/-

अध्यक्षांनी अशी सूचना केली की, 1989-90 चा वार्षिक प्रशासन अहवाल विधी मंडळाच्या नागपूर येथे होणा-या अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात सादर करण्यात यावा. तसेच अमरावती येथे घेण्यात आलेल्या आढावा बैठकीतील प्रत्येक मुद्यावर कार्यवाही करण्याची काळजी घेतली जाईल असे सदस्य सचिवांनी सांगितले.

**कार्यक्रम बाब क्र. 3 व 4 :**

3 : मंडळाची गंभीर आर्थिक परिस्थिती व मंडळाला भेडसाविणा-या समस्या.

4 : सन 1993-94 मध्ये मंडळाची रोकड बद्दलची स्थिती.

कार्यक्रम बाब क्र. 3 व 4 वर एकत्रितरित्या चर्चा करण्यात आली. सुरवातीला मंडळ स्थापनेनंतर मंडळाला नगरपालिकांकडून येणे असलेली रक्कम कशा प्रकारे वाढत गेलेली आहे याचा खुलासा करुन त्यामुळे मंडळाला गंभीर आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे आणि त्याचा नागरी व ग्रामीण योजनांचे प्रगतीवर विपरीत परिणाम होत आहे असे सदस्य सचिवांनी या बाबींवर चर्चा करतांना सांगितले.

मंडळाची ही बिकट परिस्थिती होण्याची मुख्य कारणे म्हणजे (1) नगरपालिकांच्या पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी मंडळाला वेगवेगळया आर्थिक संस्थांकडून (उदा. आयुर्विमा महामंडळ, व्यापारी बँका) कर्ज उभारावे लागते. हे कर्ज नगरपालिकेच्या वतीने उभारले जाते आणि या कर्जाला शासनाची हमी असते. कर्ज उभारतेवेळी या कर्जाचे सर्व दायित्व नगरपालिका स्विकारण्यास तयार आहे. अशा प्रकारचा ठराव नगरपालिका करते. परंतु योजना पूर्ण झाल्यानंतर नगरपालिका कर्जाची परतफेड करत नाहीत व कर्जाला शासनाने हमी दिली असल्याने मंडळाला भांडवली खर्चासाठी मिळालेला निधी कर्जाची परतफेड करण्यासाठी वापरावा लागतो.

(2) शिवाय मंडळ काही नगरपालिकेंना ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करते. परंतू हया पाण्याचे बिलाचे पैसे देखिल नगरपालिका भरत नाहीत.

(3) योजना राबवितांना नगरपालिकेकडून देय असलेली लोकवर्गणी नगरपालिका वेळोवेळी भरत नाही.

(4) ग्रामीण पाणी पुरवठा तसेच नागरी पाणी पुरवठा कैंद्रे चालवण्यास लागणारा खर्च, ज्याची वसूली होत नाही अशा सर्व कारणामुळे मंडळ सध्या आर्थिक अडचणीत सापडले असून मंडळाला पैशाची नितांत आवश्यकता आहे. अशीच परिस्थिती चालू राहिल्यास मंडळाला आपल्या कर्मचा-यांचे वेतन देणे देखिल जिकिरीचे होणार आहे असे सांगून सदस्य सचिवांनी वस्तुस्थिती सविस्तरपणे मंडळापुढे मांडली.

यावेळी सहउपाध्यक्ष श्री. अशोक चव्हाण व उपाध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे यांनी सुचविले की, मंडळ खरोखरच अडचणीत असल्यामुळे मंडळाला तातडीने 50 ते 60 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. त्यानंतर सहअध्यक्षांनी अशी विचारणा केली की, ही थकबाकी वसूल करण्यासाठी मंडळाने काय कार्यवाही केली आणि असे सूचविले की, राहिलेली वसूली करण्यासाठी काय कार्यवाही करणे आवश्यक आहे याचा कालबध्द कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. यावर सदस्य सचिवांनी असा खुलासा केला की, 1988-89 पासून असंविधानीक अनुदानातून रु. 60 कोटी इतके वसूल झालेले आहेत परंतू ही वसूली मंडळाकडे रोकड स्वरुपात 90-91 पासूनच देण्यात आली या पूर्वीची वसूली शासनास प्रकल्प कर्जापोटी देय असलेल्या रक्कमापोटी समायोजित करण्यात आली आहे. सदस्य सचिवांनी असेही सांगितले की, शासन नगरपालिकांच्या अनुदानातून 50 % रक्कम काढून मंडळाला देते परंतू ही रक्कम पुरेशी नाही व 50 % पेक्षा जास्त रक्कम कापल्यास न्यायालये याला मान्यता देणार नाहीत.

मा. सहउपाध्यक्षांनी असे सुचविले की, प्रत्येक नगरपालिकेचे पूर्ण येणे दहा वर्षात परत मिळण्यासाठी त्रैमासिक हप्ता किती असावा हे योजावे आणि तेव्हढी रक्कम अनुदानातून कापल्यास ती 50 % पेक्षा जास्त झाली तरी न्यायालये ती अवैध ठरविणार नाही. मागील थकबाकीबरोबर चालू त्रैमासिकाची वसूलीही करावी म्हणजे थकबाकी न वाढता ती दरवर्षी हळूहळू कमी होईल.

मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, मंडळ नगरपालिकेच्या योजना राबविण्यासाठी कर्ज घेते परंतू हया कर्जाची परतफेड नगरपालिका करीत नाहीत आणि कर्ज उभारण्यासाठी शासनाने हमी दिलेली असल्याकारणाने हे कर्ज संबंधित वित्तीय संस्थांना वेळोवेळी मंडळाकडून परत केले जात आहे आणि यामुळे मंडळ आर्थिक अडचणीत सापडले आहे. अध्यक्षांनी असेही सुचविले की, इथून पुढे कर्जाचे व्याज व हप्त्यापोटी जेवढी रक्कम नगरपालिकेकडून प्रत्यक्ष वसूल होईल तेवढीच मंडळाने संबंधित वित्तीय संस्थांना परत करावी व उरलेली रक्कम शासनाकडून परत केली जावी. तसेच आतापर्यंत नगरपालिकेच्यावतीने मंडळाने जी कर्ज परतफेड केलेली आहे तेव्हढी रक्कम शासनाने मंडळाला परत करावी. या कर्जाला शासनाने हमी दिलेली असल्याने-च मंडळाने ही रक्कम, भांडवली खर्चासाठी वापरत असलेल्या निधीतून, वित्तीय संस्थांना परत केली आहे. अशा प्रकारे मंडळाने परतफेड केलेल्या कर्जाची रक्कम शासनाकडून परत मिळाल्यास मंडळाची जी आर्थिक कुचंबणा होत आहे, ती थोडयाफार प्रमाणात कमी होईल. असा प्रस्ताव मंडळाकडून शासनास पाठविण्यात यावा असे अध्यक्षांनी सुचविले. मा अध्यक्षांच्या या भुमिकेतील अडचण विषद करताना सदस्य सचिवांनी असे सांगितले की, जर हे हप्ते वेळेवर भरले गेले नाहीत तर मंडळाची पत कमी होते व खुल्या बाजारातून कर्ज उभे करताना मंडळाने कितीवेळा वेळेवर पैसे भरले नाहीत किंवा व्याज भरले नाही हे विचारात घेतले जाते. तेंव्हा हा मार्ग अवलंबिल्यास मंडळ कालांतराने आयुर्विमा मंडळाकडून किंवा खुल्या बाजारातून कर्ज उभारु शकणार नाही त्यामुळे असे परतफेडीचे हप्ते शासनाने मंडळाला देणे व ते मंडळाने त्या संस्थांना भरणे हाच हयातला योग्य मार्ग होय.

सदस्य सचिवांनी असेही सुचविले की, ग्रामीण पाणी पुरवठा योजना संबंधित ग्राम पंचायत वा जिल्हा परिषदा यांनी ताब्यात न घेतल्यामुळे खुप मोठया प्रमाणात ग्रामीण पाणी पुरवठा योजना मंडळाला चालवाव्या लागतात आणि यासाठी शासनाकडून कोणताही निधी उपलब्ध केला जात नाही. मात्र अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार शासनाकडून ग्रामीण योजना राबविण्यासाठी निधी जिल्हा परिषद यांना उपलब्ध करुन दिला जातो. मात्र हा निधी जिल्हा परिषद मंडळाला उपलब्ध करुन देत नाहीत यामुळे देखिल मंडळाला भांडवली खर्चासाठी असणारा निधी या ग्रामीण योजना राबविण्यासाठी वळविला जातो. अशा प्रकारे आतापर्यंत 39.00 कोटी रुपये इतकी रक्कम ग्रामीण पाणी पुरवठा योजना चालविण्यासाठी मंडळाने खर्च केली आहे ज्याची भरपाई ग्राम विकास विभागाकडून होणे आवश्यक आहे. यावर सहअध्यक्ष यांनी असे सुचविले की, ग्रामीण पाणी पुरवठा चालविण्यासाठी ग्राम विकास विभागाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारचा प्रस्ताव ग्राम विकास विभागाला पाठवावा तसेच जिल्हा परिषदेला देण्यात येणा-या देखभाल व दुरुस्ती निधीतून ग्रामीण पाणी पुरवठा योजना चालविण्यासाठी लागणारा निधी मंडळाला उपलब्ध करुन देण्यात यावा. शेवटी, चर्चेनंतर खालीलप्रमाणे प्रस्ताव तयार करुन शासनास पाठविण्याच्या सूचना अध्यक्षांनी दिल्या.

1) आतापर्यंत मंडळाने नगरपालिकेच्यावतीने मार्च, 1993 पर्यंत रु. 28.94 कोटी इतकी रक्कम कर्जापोटी जी परतफेड केली आहे तेव्हढी रक्कम शासनाने मंडळास त्वरीत उपलब्ध करुन द्यावी.

2) नगरपालिकेकडून येणी असलेली रक्कम वसूल होत नाही आणि असंविधानिक निधीतून जी रक्कम वसूल केली जाते ती रक्कम कमी असल्यामुळे संपूर्ण वसूली होणे कठीण आहे. त्यामुळे सध्या नगरपालिकेकडून येणे असलेल्या रक्कमेची दहा वर्षात वसुली होईल असा एक कालबध्द कार्यक्रम करावा आणि तो मंडळापुढे मान्यतेसाठी मांडण्यात यावा. शासनातर्फे वसुली करताना मागील थकबाकी समान

त्रैमासिक हप्त्यात करावी व चालू देणीहि वसूल करावी म्हणजे थकबाकी न वाढता कमी होत जाईल.

3) ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना चालविण्यापोटी मंडळाने स्वतःचा जो निधी खर्च केला आहे तो निधी मंडळाला परत करावा असा प्रस्ताव ग्राम विकास विभागाला अशा रितीने पाठविण्यात यावा की जेणेकरुन याबाबतीत जिल्हा परिषदेला देण्यात येणा-या देखभाल व दुरुस्ती निधीतून कपात करुन मंडळाला निधी उपलब्ध करुन देण्यांत येईल.

4) सहअध्यक्षांनी असेही सुचविले की, कार्यक्रमबाब क्र. 4 च्या प्रारुप ठरावात 50 कोटी रुपयाचा अतिरिक्त निधी अथवा कर्ज म्हणून जो उल्लेख केलेला आहे तेथे कर्जाच्या ऐवजी मंडळाला शासनाने 50 कोटी रुपयाचे अतिरिक्त अनुदान देण्यात यावे असा बदल करुन ठराव पारित करण्यात यावा व हे अनुदान वरील विवेचनात दिलेल्या खर्चामुळे कसे आवश्यक आहे हयाची आकडेमोडहि द्यावी त्यानंतर खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला :-

"सार्वजनीक हीत लक्षात घेवून मंडळ शासनास अशी विनंती करते की, जनतेला योग्य प्रकारे व शुध्द पाणी पुरवठा त्वरीत उपलब्ध व्हावा म्हणून मंडळाला किमान रु. 50 कोटी अतिरिक्त अनुदान शासनाने त्वरीत उपलब्ध करुन द्यावे म्हणजे या वर्षी कामे चालू असलेल्या सर्व योजनांची अंमलबजावणी वेळेवर करता येईल व तयाचा फायदा जनतेला त्वरीत मिळेल."

असा प्रस्ताव तयार करुन शासनास पाठविण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

कार्यवाही
वि.स. व मु.ले.अ.

5) मंडळाच्या आर्थिक अडचणीवर उपाययोजना करण्यासाठी मा. अध्यक्ष व नगर विकास मंत्री, सहअध्यक्ष, मंत्री, ग्राम विकास, सहउपाध्यक्ष व राज्यमंत्री, नगर विकास आणि उपाध्यक्ष, राज्यमंत्री, ग्राम विकास व सदस्य सचिव यांनी वित्त मंत्री यांच्याशी चर्चा करण्याचे ठरविले.

**कार्यक्रम बाब क्र. 5 :**

**विषय :** नव्या मुंबई क्षेत्रातील न्हावा शेवा उप विभागासाठी पाणी पुरवठा योजनेची कामे : टप्पा-1 (पूर्ण), टप्पा-2 मोर्बे धरण (प्रगतीपथावर) व टप्पा-3 (प्रस्तावित) ही सिडको व / वा नवी मुंबई महापालिकेकडे मालकीसह तात्काळ हस्तांतर करण्याबाबत.

सदस्य सचिवांनी प्रथम या प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती देतांना असे सांगितले की, न्हावा शेवा प्रकल्पासाठी पाणी पुरवठा योजना टप्पा-1, मुळात सिडको व नेहरु पोर्ट ट्रस्ट यांच्याकरिताच योजण्यात आली, तसेच नवी मुंबई क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन भविष्य काळातील गरज भागविण्यासाठी टप्पा-2 म्हणून "मोरबे धरणाचे" काम मंडळाने हाती घेतले आहे. या योजनेचा खर्च 23 टक्के अनुदान व उरलेली रक्कम खुल्या बाजारातून कर्ज काढून करावयाचा आहे. टप्पा-1 साठी मंडळाने 20 कोटी रुपयाचे कर्ज उभारलेले आहे त्याच्या परतफेडीची वार्षिक रक्कम रु. 3 कोटी इतकी आहे. टप्पा-2 ही 70 कोटीची योजना असून त्यासाठी 47 कोटी रुपये खुल्या बाजारातून उभारावे लागणार आहेत. आतापर्यंत रु.12.64 कोटी इतके कर्ज उभारण्यात आले असून 30 टक्के काम पूर्ण करण्यात आलेले आहे. मंडळाची सध्याची आर्थिक परिस्थिती विचार घेता ही योजना मंडळाकडून राबविणे जिकिरीचे झाले आहे. नवी मुंबई विभागाच्या विकासाची मुख्य जबाबदारी सिडकोकडे असल्याने ही योजना यापुढे राबविण्याची जबाबदारी सिडकोकडे देण्याचे प्रस्तावित आहे. सिडकोला योग्य वाटल्यास सिडकोच्या वतीने हे काम मंडळाकडे पूर्ण ठेव योजना म्हणून देण्यास हरकत नाही. सिडकोच्यावतीने

निधी मिळाल्यास हे काम मंडळ कार्यान्वित करेल.

यावर मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, योजना नवी मुंबई महानगरपालिकेला न सोपविता सिडकोकडे सोपविण्यात यावी.

यावर सविस्तर चर्चेनंतर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आले.

सदर कार्यक्रम बाबीमध्ये मोर्बे धरणाच्या कामाबाबत दिलेली पूर्वपिठीका, कामाची सद्यस्थिती व निधीबाबतच्या अडचणी याबाबत जी माहिती देण्यात आली आहे, त्याचा उचित अशा गांभीर्याने विचार करण्यांत येऊन मंडळ असा ठराव करीत आहे की,

न्हावा शेवा पाणी पुरवठा प्रकल्प टप्पा-2 (मोर्बे धरण) हे काम सध्या लोकवर्गणी, शासकीय अनुदान व खुल्या बाजारातून उपलब्ध होणारे कर्ज याद्वारे मंडळ करीत आहे, त्या कामाची मालकी सिडकोकडे हस्तांतर करणेबाबत शासनास विनंती करण्यात यावी. त्याबाबत मंडळ व सिडको यांनी आपसात चर्चा करुन हस्तांतराच्या अटी व शर्ती ठरवाव्यात. धरणाचे काम यापुढे मंडळाकडे सोपवायचे झाल्यास, मंडळास आवश्यकतो निधी सिडको यांनी उपलब्ध करुन द्यावा व धरणाचे काम मंडळाने पूर्ण करुन ते धरण सिडको यांचेकडे हस्तांतर करावे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, न्हावा शेवा पाणी पुरवठा टप्पा-1 हे पाणी पुरवठा केंद्र व या केंद्राची क्षमता रोजी 50 द.ल.लिटर वरुन 100 दशलक्ष लिटर एवढी करण्यासाठी केलेल्या कामांची मालकी, दायित्वासह, सिडको नवी मुंबई यांचेकडे हस्तांतर करावी.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, मोर्बे धरणातील पाणी उचलून शुध्द करुन ग्राहकांपर्यंत पोचविणेसाठी सुमारे 275 कोटी रुपये खर्चाचा जो एक निराळा प्रकल्प हाती घ्यावयाचा आहे, तो नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सिडकोने हाती घ्यावा. या संस्थांनी इच्छा व्यक्त केल्यास हा प्रकल्प मंडळाने त्यांना तयार करुन द्यावा व त्यास शासकीय स्तरावर प्राधान्याने प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

कार्यवाही
मुख्य अभियंता (प्रकल्प)

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, नवी मुंबई क्षेत्रांमध्ये हेतवणे धरणातून पाणी उचलून ते पाणी पुरविण्याचा सिडकोचा जो सध्या विचार आहे, तो फलद्रुप झाल्यावर सुध्दा सिडको, व नवी मुंबईच्या पुढील गरजांसाठी मोर्बे धरण पूर्ण करुन त्याचे पाणी वापरण्यांवर सिडकोने भर द्यावा. हे दोन स्त्रोत अपुरे पडल्यासच नंतर बाळगंगा नदीवर आधारीत प्रकल्पाचा विचार करावा. ही बाब शासनाच्या नजरेस आणून देण्यात यावी.

वरील ठराव अंमलात आणण्याच्या दृष्टीने सदस्य सचिवांनी पाऊले उचलावीत व आवश्यक तो पत्रव्यवहार करावा.

**कार्यक्रम बाब क्र.6 :**

**विषय :** महा. पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळामध्ये अंतिमरित्या समाविष्ट झालेल्या व दिनांक 1.11.79 किंवा नंतर निवृत्त / मृत झालेल्या कर्मचा-यांचे बाबतीत मंडळाने अदा केलेल्या निवृत्ती वेतन विषयक खर्चाची महा. शासनाने अदा करावयाची प्रतिपूर्ती.

ही बाब सदस्य सचिवांनी बैठकीत विषद केली व विषद करतांना खालील गोष्टी निदर्शनास आणल्या. 1.11.79 रोजी मंडळामध्ये समाविष्ट झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांची शासनाकडे

केलेली सेवा लक्षात घेवून निवृत्त वेतनाच्या दायित्वाच्या प्रमाणशील भागाची शासनाने प्रतिपूर्ती करणे आवश्यक आहे अशी प्रतिपूर्ती करताना द्विभाषीकाच्या घटक राज्यात जसे पेन्शनचे अंशदान करण्यात येते त्या तत्वावर करावे यानंतर अध्यक्षांनी असे सुचविले की, वित्त विभागाला पाठविण्याची आवश्यक माहिती तंज्ञ सल्लागाराकडून (ॲक्चुअरी) तयार करुन घ्यावी या वरती होणाऱ्या योग्य खर्चाला मंडळाची मान्यता आहे.

उपरोक्त माहिती वित्त विभागाला सादर करेपर्यंत मंडळानी मागितलेली रक्कम शासनाने उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती शासनास करण्यात यावी.

**ठराव :**

कार्यवाही
वि.स. व मु.ले.अ

मंडळ असा ठराव करते की, मागणीनुसार शासकीय कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतनाची प्रतिपूर्ती द्विभाषीकाच्या घटक राज्यात विभागणी करण्यात येते त्याप्रमाणे करण्यासाठी आवश्यक ती रक्कम शासनाने मंडळाला उपलब्ध करुन द्यावी.

मंडळ असाही ठराव करते की, वित्त विभागाला आवश्यक असलेली माहिती देणे हे काम जिकरीचे असल्यामुळे ते एखाद्या तंत्र सल्लागाराची नेमणूक करुन त्यांचेकडून करुन घेण्यात यावे व त्यासाठी योग्य ते मानधन देण्यास मंडळ मान्यता देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. 7 :**

**विषय :** अंबरनाथ, बदलापूर पाणी पुरवठा केंद्रांतर्गत 762 मि.मि. व्यासाच्या पोलादी जलवाहिनीचे काम घसारा निधीतून हाती घेण्याबाबत.

कार्यक्रम बाब मांडताना सदस्य सचिवांनी असे प्रतिपादन केले की, अंबरनाथ / बदलापूर पाणी पुरवठा योजना ही शासकीय योजना असून ती 1924 साली कार्यान्वित झालेली आहे त्यामुळे तेथील पोलादी जलवाहिन्या बदलणे अत्यंत आवश्यक आहे. जलवाहिन्या बदलण्याचे काम ही स्वतंत्र योजना नसल्याने हे काम घसारानिधीतून करावयाचा प्रस्ताव आहे व यासाठी घसारा निधी नियमानुसार मंडळाची मान्यता आवश्यक आहे. चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात आला.

कार्यवाही
मुख्य अभियंता (प्रकल्प)

**ठराव :** मंडळ असा ठराव करते की, अंबरनाथ, बदलापूर पाणी पुरवठा केंद्रांतर्गत 762 मी.मी. व्यासाच्या पोलादी जलवाहिनीचे रु. 217.83 लाख अथवा प्रत्यक्ष खर्च इतक्या किंमतीचे काम मंडळाच्या घसारा निधीच्या रक्कमेतून हाती घेण्यास मंजूरी देत आहे. घसारा निधीतून योग्य ती रक्कम काढण्याचे अधिकार सदस्य सचिवांना व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र. 8, 9, 10 :**

**विषय 8 :** कमी खर्चाची स्वच्छता कार्यक्रमासाठी हुडकोकडून रु. 19.90 लाख कर्ज उभारणेबाबत.

**विषय 9 :** कमी खर्चाची स्वच्छता कार्यक्रमासाठी हुडकोकडून रु. 543.87 लाख कर्ज उभारणेबाबत.

**विषय 10 :** नेहरु रोजगार योजने अंतर्गत घरबांधणी व गृहसुधार कार्यक्रमासाठी हुडको, मुंबई यांचेकडून कर्ज उभारणीबाबत.

...8/-

सदस्य सचिवांनी प्रस्ताव मांडून पार्श्वभूमि थोडक्यात विषद केली त्यानंतर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

कार्यवाही
वि स व मु ले अ

**ठराव 8 :** कमी खर्चाच्या स्वच्छता योजनासाठी (रुपांतरण) सिल्लोड, जि. औरंगाबादसाठी रु. 14.40 लाख आणि उदगीर, जि. लातूर करिता रु.5.50 लाख असे एकूण रु. 19.90 लाख हुडको कर्ज स्विकारण्यास कर्जाच्या अटी / शर्तीसह मंडळ संमती देत आहे. आणि सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना कर्जासाठी हुडकोकडून व शासन हमीसाठी शासनाकडे संपर्क साधण्याबाबत अधिकार देण्यांत येत आहे.

कार्यवाही
वि स व मु ले अ

**ठराव 9 :** कमी खर्चाची स्वच्छता योजनासाठी (बांधकाम) रु.543.87 लाख हुडको कर्ज स्विकारण्यास कर्जाच्या अटी / शर्तीसह मंडळ संमती देत आहे. आणि सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना कर्जासाठी हुडकोकडे व शासन हमीसाठी शासनाकडे संपर्क साधण्याबाबत अधिकार देण्यांत येत आहेत.

कार्यवाही
वि स व मु ले अ

**ठराव 10 :** नेहरु रोजगार योजना घरबांधणी व गृह सुधार कार्यक्रमासाठी रु. 4,47,000/- हुडको कर्ज (कर्जाच्या अटी / शर्तीसह) स्विकारण्यास मंडळ संमती देत आहे. आणि सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना कर्जासाठी हुडकोकडे व शासन हमीसाठी शासनाकडे संपर्क साधण्याबाबत अधिकार देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र. 11 :**

**विषय :** जागतिक बँक अर्थसहाय्यीत महा. ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प टप्पा-1 मधील पॅकेज - 2 च्या निविदाच्या स्विकृतीस मान्यता.

कार्यवाही
अधीक्षक अभियंता (मुख्यालय)

या प्रकरणी हा ठराव मंडळापुढे आणण्यात येणे का आवश्यक आहे याबाबत सदस्य सचिवांनी स्पष्टीकरण केले व या प्रस्तावास शासनाची व जागतिक बँकेची मान्यता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या कार्यवाहीला कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. 12 :**

**विषय :** जागतिक बँक अर्थसहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प टप्पा क्र.1 मधील निविदांतील डीम्ड् एक्सपोर्ट बाबतचे ठेकेदारांना द्यावयाचे फायदे.

या कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अध्यक्षांनी अशी सूचना केली की, या प्रकरणी ॲड. जनरल यांचा सल्ला घेण्यात यावा व तोपर्यंत ही बाब तहकुब ठेवण्यात यावी.

**कार्यक्रम बाब क्र. 13 :**

**विषय :** बाणकोट प्रादेशिक ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना (ता.मंडणगड, जि. रत्नागिरी) मे. पटेल कंस्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदारांचे वरील योजनेतील धरणाच्या कामाचे कंत्राटातील अस्केलेशन संबंधीच्या मागणीबाबत.

या बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. हे बांधकाम पूर्ण करण्यासाठी सात वर्षाचा कालावधी का लागला व त्यास मंडळ कितपत जबाबदार आहे या बाबीवर सविस्तर माहितीसह ही बाब पुढील बैठकीत ठेवण्यात यावी असे अध्यक्षांनी सूचविले.

(10)

**कार्यक्रम बाब क्र. 14 :**

**विषय :** अहमदनगर मलनि:सारण योजना (10.5 द.ल.लिटर्स प्रतिदिनी क्षमतेच्या) मलशुध्दीकरण केंद्राची संकल्पना व बांधकाम करणे. मे.हायड्रोलिक्स अँड जनरल ईंजिनिअर्स कंपनीचे वाढीव एस्केलेशनच्या मागणीबाबत.

या बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि हा विषय वरील बाब क्र. 13 प्रमाणेच पुन्हा पुढील बैठकीत ठेवावा असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र. 15 :**

**विषय :** संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथील अधीक्षक अभियंता- 1 पद, उप अभियंता-2 पदे व वरीष्ठ वैज्ञानिक, सहा.-1 पद यांस विशेष भत्ता मिळणेबाबत.

सदस्य सचिवांनी या प्रकरणातील पार्श्वभूमि विषद केली. या प्रकारचा भत्ता शासनामध्ये मेरी नाशिक येथील अभियंत्यांना देण्यात येत असल्यामुळे तो मंडळातील संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिकरोड येथील संबंधित अभियंतांना देण्यास हरकत नसावी व तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा असे ठरले.

कार्यवाही
मु प्र अ

**ठराव :** संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथील खालील पदांना त्यांच्यासमोर नमुद केलेला विशेष भत्ता देण्यास मंडळ या ठरावाद्वारे मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) अधीक्षक अभियंता | 1 पद | रु. 350/- प्रतिमहा |
| 2) उप अभियंता | 2 पदे | रु. 200/- प्रतिमहा |
| 3) वरीष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | 1 पद | रु. 200/- प्रतिमहा |

शासनाकडून वरील विशेष भत्त्यास मान्यता मिळविण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाहीबाबतचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यास मंडळ संमती देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. 16, 17 व 18 :**

सदस्य सचिवांनी या विषयावर माहिती दिली व खालील ठराव मान्य करण्यात आले.

**ठराव 16 :**

कार्यवाही
वि.स व मु.ले.अ

असा ठराव करण्यात येतो की, सन 1989-90 चे प्रमाणित केलेले वार्षिक लेखे व त्यावरील लेखा परिक्षण अहवाल विधीमंडळापुढे ठेवण्यासाठी शासनास सादर करण्यात यावे.

असाही ठराव करण्यात येतो की, लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेदांना दिलेली उत्तरे व अभिप्रायाशी मंडळ सहमत आहे.

**ठराव 17 :**

कार्यवाही
वि.स व मु.ले.अ

असा ठराव करण्यात येतो की, सन 1990-91 चे प्रमाणित केलेले वार्षिक लेखे व त्यावरील लेखा परिक्षण अहवाल विधीमंडळापुढे ठेवण्यासाठी शासनास सादर करण्यात यावे.

... दिलेली उत्तरे व

असाही ठराव करण्यात येतो की, लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेदांना दिलेली उत्तरे व अभिप्रायाशी मंडळ सहमत आहे.

**ठराव 18 :**

कार्यवाही
मु प्र अ

असा ठराव करण्यात येत आहे की, मंडळ 1990-91 या वर्षाच्या वार्षिक अहवालास मंजूरी देत असून सदस्य सचिव यांना तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर सादर करण्याकरिता शासनाकडे पाठविण्याचा अधिकार देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब सूची क्र. 19 :**

**विषय :** ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याचे लक्षनिश्चित करणे. स्थानिक अधिका-यांची (अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता) मते आजमावण्याच्या गरजेबाबत.

या प्रकरणी सदस्य सचिवांनी सविस्तर माहिती दिल्यानंतर खालील ठराव मंजूर करण्यात आला.

कार्यवाही
मुख्य अभियंता
(ग्रामीण)

**ठराव :** शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागास 20 कलमी कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण करणेची उदिष्टे नक्की करणेपूर्वी शासनाने मंडळाच्या स्थानिक अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता यांचेशी सल्लामसलत करुनच ही उदिष्टे अंतिम ठरवावीत.
अशा योजना पूर्ण करण्यासाठी योग्य तो कालावधी व पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा. मंडळाचे सदस्य सचिवांना अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित करणेचे अधिकार देणेत येत आहेत.

**विषय 20 :** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची सद्यस्थिती.

कार्यक्रम बाबीमध्ये दिलेल्या माहितीची सर्व सदस्यांनी नोंद घेतली व चर्चेमध्ये असे ठरविण्यात आले की, प्रतिवर्षी ग्रामीण योजनांचे उदिष्ट ठरविताना आर्थिक परिस्थिती विचारात घेवून व ज्या योजना निश्चित पूर्ण होतील अशाच योजना उदीष्टात घेण्यात याव्यात तसेच अशा प्रकारचा आढावा नागरी पाणी पुरवठा योजनाबाबतही घेण्यात यावा.

**कार्यक्रम बाब क्र. 21**

**विषय :** कराड नगरपालिका, जि. सातारा क्षेत्रात उद्भवलेली काविळीची साथ संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना निलंबित करण्याबाबत.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. असे ठरले की, यावर निर्णय घेणे अध्यक्षांवर सोपवावे म्हणजे ते शासनाच्या उप जिल्हाधिकारी यांनी सादर केलेला अहवाल व यासंबंधीची कागदपत्रे पाहून योग्य तो निर्णय घेतील.

**टेबल आयटम 1 :**

या विषयावर चर्चा झाल्यावर 1993-94 ला खुल्या बाजारातून कर्ज उभारण्यास मंजूरी देण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

कार्यवाही
वि स व मु ले अ

**ठराव :** असा ठराव करण्यात येतो की, सन 1993-94 या वित्तीय वर्षात महा. पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या नागरी पाणी पुरवठा योजनाकरिता रु. 171700000 (रु. सतरा कोटी सतरा लक्ष फक्त) कर्ज महा. शासनाच्या मंजूरीनुसार पत्र क्र.एलएनएफ.1093/पृ.क्र.90/अर्थोपाय, दिनांक 21.9.93 आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अटी व शर्ती पत्र क्र. आयडीएमसी/970/08.05.25/93-94 दिनांक 18.10.93 प्रमाणे खुल्या बाजारातून उभारण्यात यावे.

मंडळ असाही ठराव करते की, याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास व कर्ज उभारणीस सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

चर्चेच्या अखेरीस अध्यक्षांनी खालील सूचना केल्या.

1) यापुढे मंडळाची बैठक दर तीन महिन्यात घेण्यात यावी. यापुढील बैठक नागपूर अधिवेशन संपल्यावर घेण्यात यावी.

2) मंडळाच्या बैठकीसाठी कार्यक्रमबाबी संबंधीची कागदपत्रे सदस्यांना बैठकीच्या किमान आधी आठ दिवस देण्यात यावी.

3) नागरी अथवा ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या विभागवार घेण्यात येणा-या योजना आढावा बैठकींना त्या त्या विभागातील मंडळाच्या सदस्यांना बोलविण्यात यावे.

मंत्री, नगर विकास व अध्यक्ष यांनी आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे सांगितले.